ISSN 2278-3954 Saptahik Nagara

साप्ताहिक

नगारा

संस्थापक संपादक : दलितमित्र स्व. गोविंदराव गोरवाडकर

R.N.I. No. 16746/67 पोष्टाचा परवाना क्र. एम.जी.एन.३९/२०१८-२०२०

श्री. _____

पत्ता _____

_____

वरील पत्त्यावर अंक न पोहोचल्यास परत पाठविण्याचा पत्ता : मा. संपादक सा. नगारा, ८५२, गोरवाडकर वाडा, मालेगांव कँम्प (नाशिक)

NAGARA WEEKLY

* मंगळवार दि. २७ ऑगस्ट २०१९

देवा तुचि गणेशु

संस्थापक संपादक
दलितमित्र
स्व.गोविंदराव गोरवाडकर
मुख्य मानद संपादक
डॉ. विनोद गोरवाडकर
संपादक
सौ. सोनाली विनोद गोरवाडकर
कार्यकारी संपादक
मुरलीधर जोशी

◆

दूरध्वनी:०२५५४-२५२८७३
भ्रमणभाष: ९४२३४७७२७३
९४२१३७३८७३

◆

वर्ष ५३ वे
अंक ०३

◆

दि. २७ ऑगस्ट २०१९
ते दि. ३ सप्टेंबर २०१९

◆

किरकोळ अंक रु.३/-
वार्षिक वर्गणी रु.३००/-

नगारा वीकली हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक सौ. सोनाली विनोद गोरवाडकर यांनी जयंत प्रिंटींग प्रेस, ८५२, मालेगांव कॅम्प, ४२३१०५ जि.नाशिक (महाराष्ट्र) येथे छापून ८५२, मालेगांव कॅम्प, ४२३१०५, जि. नासिक (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. संपादक - सौ. सोनाली विनोद गोरवाडकर
फोन : (०२५५४) २५२८७३
nagaraweekly@gmail.com
या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकूराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद मालेगांव न्यायकक्षेत



संपादकीय

झटणे हे या जगण्याचे तत्त्व
मनी तू जाण। - केशवसुत

देवा तुचि गणेशु

तुम्हा-आम्हा साऱ्यांसांठी सदैव आनंदनिधान ठरलेल्या श्री गणरायांचे आगमन प्रत्येकाच्या उंबरठ्यापाशी येवून ठेपले आहे. खरं तर गणरायांची वसती प्रत्येकाच्या मनीमानसी कायमस्वरुपी आहेच, परंतु प्रत्यक्ष पूजनासाठी वर्षाच्या कालचक्रात विशिष्ट असे दहा दिवस शास्त्राने उपलब्ध करुन दिले आहेत. या दहा दिवसात शास्त्र-कला-धर्म-परस्परांशी सुसंवाद या साऱ्या गोष्टी निकोप-निरलस-निरागस-निर्वैर या मनाच्या अत्युच्च अवस्थेत करण्याची अपेक्षा शास्त्रकारांनी ठेवली आहे. गणरायांचे आगमन लहानांपासून मोठ्यांपर्यंत साऱ्यांनाच आनंददायी वाटते. दहा दिवसांच्या वास्तव्यानंतर बाप्पांनी जावूच नये अशी मनोमन सारेचजण प्रार्थना करीत असतात. भारतीय मनावर अधिराज्य करणारे गणपती बाप्पा दरवर्षीच हर्षोल्हासाचे वातावरण निर्माण करीत असतात.

घरात येणारे बाप्पा आणि सार्वजनिक उत्सवात ठिकठिकाणी मंडपांमध्ये स्थानापन्न होणारे गणराय आनंदनिधान असतात. जीवनाचा मार्ग सुखकारक करावा यासाठी कुठल्याही कार्याच्या प्रारंभी बाप्पांची आराधना केली जाते. अशा बाप्पांचे वास्तव्य सर्वत्र अगदी आनंदी वातावरणात असावे यासाठी साऱ्यांनी प्रयत्नशील असले पाहिजे.

समाजाला दिशा देण्याचे कार्य सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून उत्तमप्रकारे करता येवू शकते. चांगले दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम समाजाला देऊन टी.व्ही.वर सुरु असणाऱ्या बिभत्स प्रकारापासून समाजमन वळविणे शक्य होवू शकते. राष्ट्रप्रेमाची भावना भक्तीच्या मार्गाने सहजपणे वाढीस लागू शकते. घराघरात-मनामनात गणरायांच्या उपस्थितीचा एक अवर्णनीय भाव या दिवसांमध्ये जागृत झालेला असतो. त्याचा उपयोग योग्य प्रकारे कसा करुन घ्यावा हे सार्वजनिक मंडळांनी बघितले तर चित्र वेगळे दिसू शकेल.

श्रावणाचा मनमोहक कालखंड उलटून गेल्यावर पाऊसाच्या रिमझिमत्या अस्तित्वात सभोवतालच्या नटलेल्या निसर्गात गणपतीबाप्पा येतात. साऱ्यांवर माझे वात्सल्यपूर्ण लक्ष आहे, असं सांगतात. सुखकारक वातावरणाची निर्मिती करतात. दु:खाला पळवून लावतात आणि हुरहूर लावत निघून जातात, ते पुढच्या वर्षापर्यंत! बाप्पांचं हे शुभंकर येणं स्वत:चं आणि सभोवतालच्या समाजाचं चांगलं करण्याची उत्तम संधी आहे, असे मनापासून समजून तिचा उपयोग करुन घेतला, तर सारं काही आनंददायी होईल, यात संदेह कुठला?

यावर्षी कुठे प्रचंड महापूर तर कुठे अत्यंत दुष्काळ अशी परस्परविरोधी अस्मानी आणि त्यानंतर सुलतानी संकटांची मालिका महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर गणरायांनी या संकटातून साऱ्यांना तारावे आणि जगण्याची उभारी प्रदान करावी अशी प्रार्थना आपण सारे त्यांच्या चरणी करु या.

भूक आणि शाळा

।। मुक्तक ।।
प्रा.सुरेश भिलकोटकर
मो. : ९४२१६०९४३७
(लेखक मुक्त विद्यापीठात प्राध्यापक आहेत.)

नाशिक जिल्ह्यातल्या मालेगाव तालुक्यातील माळमाथा हा परिसर विविध अर्थाने शापित प्रदेश म्हणायला हवा. वर्षानुवर्षे वरुणराजाची अवकृपा... त्यासोबतचे अवर्षण.... ७१-७२च्या सलगच्या दुष्काळाने तर खेड्याची कंबरडी मोडली. स्वातंत्र्यानंतर अनेक वर्ष मंत्रीपद मिळालेले असूनही शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रातही अत्यंत मागासलेला हा परिसर. स्वातंत्र्यानंतर सात दशके उलटली...तरी या गावांत आजही पोस्ट ऑफीस नाही. माध्यमिक शाळा नाही. महामंडळाची बस नाही.

असे असूनही परिस्थितीशी मुकाबला करुन आपापली स्थानं निर्माण करणारी माणसंही या परिसरात झाली. त्या प्रत्येकाची कहाणी वेगळी. माळमाथा परिसरात झोडगे हे गाव एक केंद्रबिंदू आजही आहे. आठवडे बाजार, माध्यमिक शाळा तसेच तालुका आणि जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठीचा मार्ग येथूनच असल्याने तसे ते पंचक्रोशीतील आबल वृध्दांना ठाऊक! अर्थात ही परिस्थिती पूर्वापार आलेली आहे.



साधारण चाळीस-पंचेचाळीस वर्षापूर्वीची गोष्ट त्यावेळी आसपासच्या बहुतांश गावात शिक्षणाची सोय नसल्याने आसपासच्या खेड्यांमधून मुले झोडग्याला माध्यमिक शाळेसाठी जायची. दररोज नऊ-दहा किलोमीटर अनवाणी पायपीट करणाऱ्या या पोरांना पोटभर अन्न नसायचे. पोटभर असायची ती भूक! अख्खे आयुष्य व्यापून टाकणारी. झोडग्याला गुरुवारी आठवडे बाजार असायचा. तेव्हा शाळेतील काही मुले बाजारात दप्तरासह जायची. ती अर्धातास असायची. या सुट्टीत काही मुले बाजारात जायची...पोटात भूकेचा डोंब उसळलेला असायचा...सभ्य घरातील ही पापभीरु मुले चोरी करु शकत नव्हती. बाजारात फिरतांनाच वस्तूचा भाव विचारून एखादा तुकडा तोंडात टाकायचा. त्याने थोडीफार भूक भागायची. अशी सवय काही मुलांना असायची.

शरद असेच करायचा. त्यास गुळ आवडायचा. किराणा मालाची विक्री करणारी एक संपूर्ण गल्ली बाजारात असायची. किमान पंधरा-वीस दुकाने ओळीने असायची. गिऱ्हाईकांना दिसावा म्हणून दुकानदारांनी गुळ सर्वात पुढे ठेवलेला असायचा. शरद गुरुवारी अशा दहा-पंधरा दुकानात हजेरी लावायचा. गुळ काय भाव म्हणून एक ढेला उचलून तोंडात टाकायचा...पुढे चालू लागायचा...त्याचे भाव विचारणे...गुळाचा ढेला उचलणे...तोंडात टाकणे..मनातल्या मनात आनंदून...पुढे चालू लागणे..आणि कधी गुळ विकत न घेणे..हे व्यापारी मंडळींच्या लक्षात आले. दूरचित्रवाणीवर एखादे दृश्य पुन्हा पुन्हा दाखवले जावे..असेच काहीसे शरदचे गुळाचा भाव विचारणे, हळूच ढेकूळ उचलणे, तोंडात टाकणे, निघून जाणे दिसत होते.

एके दिवशी सोनूशेठने आपल्या माणसाला सांगून ठेवले...विशिष्ट ठिकाणी उभे करुन ठेवले...विशिष्ट वेळेला शरद आला...त्याने त्याच्या नेहमीच्या पद्धतीने गुळाचा भाव विचारला....एके ढिलपी उचलली...ढलपी तोंडात टाकणार तोच पाठीमागून मानेवर जोरात धपाटा बसला...तसे इतर दोघे-चौघे दुकानदार आणखीन धावले. काहींनी शरदच्या पाठीवर तर काहींनी शरदच्या कानाखाली बरसात केली. पुन्हा दिसला बाजारात तर हात पाय तोडू असा सज्जड दम सर्वांनी एका सुरात दिला... शरदमध्ये उठण्याचेही ताण नव्हते...तो काही न बोलता भामट्यासारखा उठला..फुफाट्याने भरलेले अंग उगाचच झटकल्यासारखं करीत पोटातल्या भुकेला मनातल्या मनात शिव्या देत चालू लागला. त्यानंतर त्याचे पाय कधीही झोडग्याला गुळबाजाराकडे वळले नाहीत...त्याचा झोडगे बाजार सुटला...नि शाळाही सुटली..ती कायमचीच!!

बसमध्ये बसलेल्या एका महिलेच्या मुस्कटात मारल्याच्या आरोपावरुन एका गृहस्थाला मॅजिस्ट्रेटसमोर उभे करण्यात आले.

मॅजिस्ट्रेटने विचारले, 'याचे कारण काय?'

'साहेब, त्याचं असं आहे.' तो सांगू लागला- या बाई बसमध्ये माझ्या शेजारी बसल्या.

'तर मग पुढे काय झालं?'

'त्यांनी आपली पर्स उघडली - त्यातून एक रुपया बाहेर काढला. परत तो पर्समध्ये टाकला आणि पर्स बंद केली. मग तिने कंडक्टरकडे पाहिलं आणि परत पर्स उघडली - रुपया बाहेर काढला. परत आत ठेवला आणि पर्स बंद केली. परत तिने कंडक्टरकडे पाहिलं - पर्स उघडली - रुपया बाहेर काढला - परत आत ठेवला आणि पर्स बंद केली. - तिने परत पर्स उघडली - रुपया बाहेर काढला - कंडक्टरकडे पाहिलं - आणि परत रुपया आत टाकून पर्स बंद केली.....'

'पुरे पुरे - माझं डोकं फिरायची वेळ आली.' मॅजिस्ट्रेट म्हणाला.

'साहेब - माझं तेच झालं.'?

।। श्री स्वामी समर्थ ।।
सोने चांदीचे दागिने तसेच सर्व प्रकारचे शर्शीचे रियल खडे व नवग्रह अंगठी मिळतील.

राजधर बंधू सराफ
शिवाजी रोड, सावरकर चौक, मातृपितृ अपार्टमेंट
मालेगांव कॅम्प (नाशिक)
फोन : 02554- 254056 /9657264615